**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २७१ । मंगळवार २८ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# कुळधरण येथे एलसीबीच्या छाप्यात १५ जुगारी अटकेत

## चार लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने कर्जत तालुक्यातील कुळधरण येथे छापा टाकून तिरट खेळणाऱ्या १५ जुगा-यांना रंगेहाथ अटक केली. या कारवाईत एकूण चार लाख दहा हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, कुळधरण येथील हॉटेल तिरंगाच्या पाठीमागील पत्र्याच्या शेडमध्ये काही इसम गोल बसून तिरट नावाचा पत्त्यांचा जुगार खेळत व खेळवित आहेत. पथकाने तातडीने तेथे छापा टाकला. या कारवाईत १५ जणांना रंगेहाथ पकडण्यात आले असून जुगाराचे साहित्य, मोबाईल आणि वाहने असा एकूण ४ लाख १० हजार ५७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी पोकॉ भाऊसाहेब काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ■ पान ४ वर

**अटक करण्यात आलेले आरोपी**

अतुल बाळासाहेब जगताप (रा. कुळधरण, ता. कर्जत), आयाज मोहम्मद शेख (रा. श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा), दत्तात्रय बापूराव खराडे (रा. भोसे, ता. कर्जत), शिवाजी नाना निकम (रा. दुरगाव, ता. कर्जत), प्रमोद महादेव उदमले (रा. श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा), दादा लक्ष्मण शिंदे (रा. कोपर्डी, ता. कर्जत), विनोद बापु सातव (रा. दुरगाव, ता. कर्जत), अमोल मनोहर जाधव (रा. राशीन, ता. कर्जत), संजय बबन माने (रा. राशीन, ता. कर्जत), लक्ष्मण प्रकाश जादव (रा. शिरसगावफाटा, ता. शिरुर, जि. पुणे), विजय रमेश डाळींबे (रा. आढळगाव, ता. श्रीगोंदा), विलास शाहाजी कुऱ्हाडे (रा. भिगवन, ता. इंदापूर, जि. पुणे), सुनील भागचंद घोडके (रा. श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा), प्रेमनाथ तुकाराम दामोधरे (रा. राशीन, ता. कर्जत) आणि राजू धोंडीबा बिटके (रा. बिटकेवाडी, ता. कर्जत) या १५ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भटक्या कुत्र्याचा लहान बालकावर हल्ला

## दिल्लीगेट परिसरातील सातारकर हॉस्पिटल समोरील घटना

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** घराबाहेर खेळणाऱ्या एका लहान मुलावर भटक्या कुत्र्याने जोरदार हल्ला केल्याची घटना आज मंगळवारी दुपारी घडली.

दिल्ली गेट परिसरातील बालिकाश्रम रस्त्यावर असलेल्या सातारकर हॉस्पिटल समोर ही घटना घडली. भटक्या कुत्र्याने घराबाहेर खेळणाऱ्या लहान मुलावर अचानक वाघाप्रमाणे झडप घालून या मुलास जखमी केले मुलाच्या ओरडण्याचा आवाज येताच बाजूच्या घरातील महिला धावत जाऊन सदर मुलास कुत्र्याच्या तावडीतून बाजूला केले. महिलेने धाडस दाखवल्यामुळे मोठा अनर्थ टळला. ही सर्व घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झालेली आहे. भटक्या कुत्र्याच्या अशा हल्ल्यामुळे बागरोजा हडको, गृहशील्प सोसायटी, विद्याविहार सोसायटी, सर्वोदय कॉलनी आणि बालिकाश्रम रस्ता परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सातारकर हॉस्पिटल मध्ये जिल्हाभरातून मोठ्या प्रमाणात रुग्ण येत असतात तसेच समोरच गजानन हॉस्पिटलमध्येही लहान मुलांसह रुग्ण बाहेर बसलेले असतात. सदर ठिकाणी असलेल्या




तीन-चार सोसायटीमध्ये लहान मुले ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणावर वास्तव्य करत आहेत. या सर्वांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. महानगरपालिकेने भटक्या कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा,

महानगरपालिकेने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. अन्यथा आंदोलन करून झोपलेल्या महापालिकेला जाग आणू अशी भूमिका घेतली आहे. अहिल्यानगर शहरात आणि उपनगरात हजारांच्या वर भटके कुत्रे असून या कुत्र्यांची पिलावळ वाढतच चालली आहे. महापालिकेने दिलेला ठेका श्वान निर्मिती करण्याचा आहे की निर्बीजीकरण करण्याचा ? महानगरपालिके मार्फत होणारे श्वान निर्बीजीकरण यंत्रणा ठप्प झाली आहे. या प्रकारामुळे शहरात कुत्र्यांची संख्या वाढत असल्याचे दिसून येत आहे. श्वान निर्बीजीकरण करण्याचा ठेका संस्थेने घेतला असेल तर ती संस्था दिलेले काम इमाने इतबारे करत नाही असाच अर्थ घ्यावा लागेल. श्वान निर्बीजीकरण झाल्याचे दाखवून फक्त पैसा उकळणे भ्रष्टाचार करणे एवढेच मोलाचे काम या संस्थेचे सुरू असल्याचे दिसते. यामुळे ही संस्था अहिल्यानगर शहरात ठेका घेऊन शहरातील श्वान निर्बीजीकरण करते की, निर्मिती करण करते हा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकारामुळे शहरासह ■ पान ४ वर

# ढोरकीन बसस्टँडवर तलवारीसह दहशत; जालन्यातील तरुणाला एमआयडीसी पोलिसांनी केले जेरबंद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–**ढोरकीन बसस्टँड परिसरात हातात धारदार तलवार घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका तरुणाला एमआयडीसी पोलिसांनी धाडसी कारवाई करत अटक केली. आरोपीच्या ताब्यातून ४७ सेंमी लांबीची लोखंडी धारदार तलवार जप्त करण्यात आली आहे.

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ढोरकीन बसस्टँड परिसरात एक इसम हातात तलवार घेऊन फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी पंचांसमक्ष घटनास्थळी धाव घेत संबंधित इसमास ताब्यात घेतले.

चौकशीत त्याने आपले नाव सोमनाथ रामनाथ पवार (वय ३६, रा. जामखेड, ता. अंबड, जि. जालना) असे सांगितले. त्याच्याकडे शस्त्र बाळगण्याचा कोणताही कायदेशीर परवाना नसल्याचे तपासात उघड झाले. पोलिसांनी त्याच्या ताब्यातील ४७ सेंमी लांबीची धारदार लोखंडी तलवार जप्त केली.



याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम, १९५९ मधील कलम ४ व २५ अन्वये एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. आवश्यक असल्यास याला आणखी ठळक लोकमत शैलीतील मथळा किंवा ब्रेकिंग न्यूज शैलीतही तयार करून देऊ शकतो.

# आदेशाचा भंग करणारा तडीपार आरोपी जेरबंद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** जिल्ह्यातून तडीपार केल्यानंतरही विनापरवाना वास्तव्य करत असलेल्या आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. ऋषिकेश भाऊसाहेब भगत (वय २६, रा. मांजरी, ता. राहुरी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली व गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली पथक तडीपार आरोपींची तपासणी करत होते. दिनांक २७ जुलै रोजी गोपनीय माहिती मिळाली की, आरोपी ऋषिकेश भगत हा मांजरी शिवारातील 'मथुर मेन्सवेअर' दुकानाबाहेर उभा आहे. या माहितीवरून पथकाने तात्काळ सापळा रचून त्यास ताब्यात घेतले.

तपासात आरोपी ऋषिकेश भगत याला उपविभागीय दंडाधिकारी, श्रीरामपूर यांनी ४ नोव्हेंबर २०२५ पासून अहिल्यानगर जिल्ह्यातून एका वर्षासाठी हद्दपार केले असल्याचे निष्पन्न झाले. हद्दपारीच्या आदेशाचा भंग करून जिल्ह्यात विनापरवाना फिरत असल्याने त्याच्याविरोधात पोलीस अंमलदार विशाल तनपुरे यांच्या फिर्यादीवरून राहुरी ■ पान ४ वर

# राष्ट्रवादी विलिनीकरणाबाबत दिल्लीत हालचालींना वेग

**मुंबई । वृत्तसंस्था –** गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सातत्याने दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची जोरदार चर्चा सुरु आहे. मध्यंतरी विलिनीकरणाची मोहीम बारगळल्याचे वाटत होते. मात्र, गेल्या काही दिवसांमध्ये दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या प्रक्रियेने पुन्हा वेग धरला आहे. पार्थ पवार आणि प्रफुल पटेल यांनी शरद पवारांची दिल्लीत भेट घेतल्याचे समजते. या भेटीमुळे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची प्रक्रिया पुन्हा सुरु होण्याची शक्यता आहे.

दिल्लीत जंतर मंतरवर कॉकरोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरु असताना बुधवारी शरद पवार यांनी संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. या दोन्ही नेत्यांमध्ये बराचवेळ चर्चाही झाली होती. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी पार्थ पवार आणि प्रफुल पटेल हे दोघे शरद पवारांना भेटायला गेल्याने मोदींच्या भेटीनंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चक्रं फिरल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून संसदेत येऊन घातलेल्या लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एनडीएसोबत जाण्याची चर्चा सातत्याने सुरु आहे. भाजप श्रेष्ठींनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीला अजित पवारांच्या ■ पान ४ वर

# देशभरात गो सन्मानार्थ एकच कायदा व्हावा!

## मागणीसाठी गो सन्मान अभियानात साडेतीन लाख सह्यांचे निवेदन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** गो सन्मान अभियानाचा दुसरा टप्पा काल पार पडला. जिल्ह्यातून ३ लाख ४१ हजारच्यावर गो प्रेमींनी आपला सहभाग सह्यांच्या स्वरूपात नोंदवला. २७ जुलै, २०२६ रोजी तालुका निहाय सह्यांची पत्रके प्राप्त झाली ती जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्याकडे पीडीएफ स्वरूपात सपूर्द केली.

महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुरमू, मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस, आणि महामहीम राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या नावे तयार करण्यात आलेली निवेदने संयोजकांनी पीडीएफ स्वरूपात पेन ड्राइव्हच्या माध्यमातून जिल्हाधिकारी आशिया यांच्याकडे सुपूर्त केली.

गो सन्मान अभियानांतर्गत संपूर्ण देशभर राबवण्यात येत असलेल्या या अभियानांतर्गत २७ एप्रिल २०२६ रोजी तहसील कार्यालयामध्ये २१,००० सह्यांची पत्रकांचा गठ्ठा निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला होता. काल सकाळी आठ वाजता रासने नगर परिसरातील सतनाम साक्षी गोशाळेमध्ये सर्व गोसेवकांनी जमून श्रीराम जय राम जय जय राम चा दोन तास जप केला. त्यानंतर एका सजवलेल्या रथात गोमातेला ठेवण्यात आले होते. मुळेवाडी (ता.कर्जत ) येथील वारकरी संप्रदायाचे विद्यार्थी विद्यार्थिनी टाळ मृदुंगाच्या गजरात भजन म्हणत या निवेदन फेरीमध्ये सहभागी झाले होते.

या अभियानाच्या जिल्हा संयोजक डॉ. अर्जून घुले, शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान व सनातन संस्थेचे बापू ठाणगे, छावाचे दता वामन, बाबासाहेब चौधरी, इस्कॉनचे संजय सोनवणे, डॉ.अनिल मरकड, योगेश जामगावकर, सुनील बजाज, भरत बोरुडे, संजय जोशी, मुकेश जाधवानी, शिर्के माऊली, श्रीमती सुमनताई बारस्कर, विश्व हिंदू परिषदेचे सुनील खिस्ती, अनिल जोशी तसेच विविध उद्योग समूहाचे संचालक, गो सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वृंदावन येथील साधु-संतांनी या अभियानाची रचना केली असून एकूण चार टप्प्यांमध्ये हे आंदोलन राबविण्यात येत आहे. त्यातील पहिला टप्पा २७ एप्रिल २०२६ रोजी पार पडला. दुसरा टप्पा नुकताच पार पडला या दोन्ही टप्प्यांमध्ये नागरिकांमध्ये जनजागृती करून त्यांच्या सह्या संकलित करण्यात येत होत्या. यापुढील तिसऱ्या टप्प्यामध्ये सह्यांचे निवेदन जिल्हा निहाय प्रमुख राज्यपाल जिस्मिनिहाय वर्मा यांना देऊन देणार आहेत. व चौथ्या टप्प्या अंतर्गत या संदर्भात काहीही कार्यवाही नाही झाली तर सर्व संत महात्मे दिल्लीच्या जंतर-मंतरवर आमरण उपोषणाला बसणार आहेत.

■ पान ४ वर

### अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत आणि जामखेड तालुक्याकरिता

# कर्जतला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावास कॅबिनेट बैठकीत मान्यता

**सभापती मा. प्रा. राम शिंदे यांच्या मागणीस मुख्यमंत्र्यांचा प्रतिसाद । जलद आणि सुलभ न्यायदान प्रक्रियेला गती मिळणार । अहिल्यानगर जिल्हावासीय, विधिक्षेत्रातील याचिकाकर्ते, अर्जदार यांचेकडून स्वागत**



**मुंबई । वृत्तसंस्था** – अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत आणि जामखेड तालुक्याकरिता कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावास आज दिनांक २८ जुलै, २०२६ रोजी माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीपरिषदेच्या (कॅबिनेट) बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयाचे अहिल्यानगरवासीयांतर्फे सहर्ष स्वागत करण्यात येत असून माननीय मुख्यमंत्री महोदय तसेच महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती मा. प्रा. राम शिंदे यांचे आभार मानण्यात येत आहेत. शनिवार, दिनांक २५ जुलै, २०२६ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती मा. प्रा. राम शिंदे यांच्या ज्ञानेश्वरी या शासकीय निवासस्थानी कर्जत तालुका वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड. कैलास शंकरराव शेवाळे, उपाध्यक्ष ॲड. दत्तात्रय चव्हाण, सचिव ॲड. अविनाश मते, ॲड. सचिन रेणुकर, ॲड. संदिप पाटील यांच्या शिष्टमंडळाने सभापती महोदयांची भेट घेऊन या संदर्भात विनंती केली होती. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती मा. प्रा. राम शिंदे यांनी, मुख्यमंत्री महोदयांना या मागणीबाबत अवगत केले जाईल आणि पाठपुरावा करुन सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार आज लगेच याबाबतचा प्रस्ताव कॅबिनेटने मंजूर केल्याने गतिमान निर्णय प्रक्रियेचा अनुभव अहिल्यानगर जिल्हावासीयांना आला. कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय कार्यान्वीत होत असल्याने जलद आणि सुलभ न्यायदान प्रक्रियेला गती मिळणार आहे. कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय निर्माण करण्याबाबतच्या या निर्णयाचे विधिक्षेत्रातील मान्यवर तसेच प्रलंबित खटल्यांसंदर्भातील याचिकाकर्ते, अर्जदार यांनी स्वागत केले आहे. कर्जत व जामखेड या तालुक्यांसाठी कर्जत जि. अहिल्यानगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयासाठी आवश्यक असणारे न्यायिक अधिकाऱ्यांचे ०१ पद, सहाय्यभूत कर्मचाऱ्यांची (शासकीय अभियोक्ता कार्यालयासह) एकूण २२ पदे, तसेच ०७ मनुष्यबळ यांच्या सेवा या नव्या व्यवस्थेत असतील.

## दै. आकर्षण निवडक

### महिला उद्योजिकांसाठी शहरात स्वातंत्र्य दिनानिमित्त ‘आनंद नगरी खरेदी महोत्सव’



अहिल्यानगर - स्थानिक महिला उद्योजिकांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, महिला गृहउद्योगांना चालना मिळवून देणे तसेच ‘व्होकल फॉर लोकल’ या संकल्पनेला बळकटी देण्याच्या उद्देशाने राधेय महिला गृह उद्योग यांच्या वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त ‘आनंद नगरी खरेदी महोत्सव’ आयोजित करण्यात आला आहे.

या महोत्सवामध्ये महिला बचत गट, गृहउद्योग चालविणाऱ्या महिला तसेच स्थानिक महिला व्यावसायिकांना आपले विविध प्रकारचे स्टॉल उभारण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. हा दोन दिवसीय खरेदी महोत्सव शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट आणि शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ ते रात्री १० या वेळेत जैन स्थानक, शिवगंगा टॉवरजवळ, मार्केटयार्ड, सारसनगर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. या प्रदर्शनामध्ये शहरातील नागरिकांसाठी विविध प्रकारची उत्पादने आणि खाद्यपदार्थ एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. या महोत्सवात कपडे, ज्वेलरी, हस्तकला वस्तू, ब्युटी प्रॉडक्ट्स, गेम स्टॉल्स तसेच विविध स्वादिष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल आकर्षणाचे केंद्र ठरणार आहेत. घरगुती व्यवसाय करणाऱ्या महिलांना आपल्या उत्पादनांचे थेट ग्राहकांपर्यंत घेऊन जाण्याची आणि नवीन ग्राहकांशी संपर्क वाढविण्याची संधी या प्रदर्शनातून मिळणार आहे. महोत्सवादरम्यान महिलांसाठी सोडत पद्धतीने आकर्षक बक्षिसांचे आयोजन करण्यात आले असून त्यामुळे खरेदीसोबतच मनोरंजनाचीही पर्वणी अनुभवता येणार आहे. यावेळी आयोजक उज्वला मालू आणि स्वाती नागोरी यांनी नागरिकांना ‘‘ऑनलाईन खरेदीपेक्षा स्थानिक व्यवसायिकांकडून ऑफलाईन खरेदीला प्राधान्य द्या’’ असे आवाहन केले. स्थानिक व्यावसायिक आणि महिला उद्योजिकांच्या उत्पादनांना प्रोत्साहन मिळाल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि अनेक महिलांना स्वावलंबी होण्यासाठी नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या महोत्सवात स्टॉल उभारण्यास इच्छुक महिला बचत गट, गृहउद्योग चालविणाऱ्या महिला तसेच व्यावसायिकांनी अधिक माहितीसाठी उज्वला मालू (७०२०३५२८१२) किंवा सौ. स्वाती नागोरी (९६५७९११०६१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल चरणी भक्तिरंगाची भावमुद्रा

## नृत्य दर्पण अकॅडमीच्या विद्यार्थिनींच्या मनोहारी नृत्याविष्कारांनी जिंकली रसिकांची मने

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त गुलमोहर रोड येथील श्री विठ्ठल मंदिर भक्तिरसाने न्हाऊन निघाले. नृत्य दर्पण डान्स अकॅडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘‘भक्तिरंग‘‘ या विशेष नृत्यसेवेत विद्यार्थिनींनी विठ्ठल, भगवान शंकर, आदिशक्ती आणि संतपरंपरेवरील भक्तिगीतांवर सादर केलेल्या मनोहारी नृत्याविष्कारांनी मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. टाळ्यांच्या कडकडाटात प्रत्येक सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद मिळाली.

कार्यक्रमाची सुरुवात मंगलमय गणेश वंदनेने झाली. अनुराधा, आराध्या, हर्षिता, थरूनिका, श्रीनिका आणि स्वरा यांनी गणरायाच्या नृत्याविष्कारातून कार्यक्रमाची सुरेख सुरुवात केली. त्यानंतर श्रावणी, गौरी, सावली, गायत्री आणि हर्षदा यांनी देवी स्तुतीवरील नृत्यातून भक्तीची अनुभूती दिली. ‘‘चंद्रचूड शिव‘‘ या गीतावर मैत्रेयी, ईश्वरी, गिरीजा, आदिती, सई आणि संस्कृती यांनी भगवान शंकराच्या विविध रूपांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

‘‘अबीर गुलाल‘‘ या विठ्ठल भक्तिगीतावर हर्षदा, सायली, समृद्धी, वैदेश्री, श्रुती, वैष्णवी आणि अदिती यांनी वारकरी संप्रदायाची भक्तिभावपूर्ण परंपरा साकारली. ‘‘अधिगिरी नंदनी‘‘ या देवी स्तुतीवर श्रव्या, श्रावणी, गौरी, सावली आणि हर्षदा यांनी, तर ‘‘नाथ प्रभू‘‘ या शिवस्तुतीवर श्रुती, सायली, समृद्धी, वेदश्री आणि वैभवी यांनी भावपूर्ण नृत्याविष्कार सादर केला.

कार्यक्रमातील आणखी एक आकर्षण ठरले ते ‘‘खेळ मांडीयेला‘‘ या विठ्ठल भक्तिगीतावरील नृत्य. रिमा, अनंती, प्रतीक्षा, स्नेहल, स्वरा, थरूनिका आणि कस्तुरी यांनी सादर केलेल्या या नृत्याने उपस्थितांना अक्षरशः वारकरी भक्तीत रंगवून टाकले. समारोप ‘‘अवघा रंग एक झाला‘‘ या संतांच्या अभंगावरील सामूहिक नृत्याने झाला. मैत्रेयी, ईश्वरी, सई, आनंदी, संस्कृती आणि आदिती यांनी सादर केलेल्या या अंतिम नृत्याने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरंगात रंगून गेला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन भारती फडके यांनी केले. नृत्य दर्पण डान्स अकॅडमीच्या संचालिका सौ. अपर्णा रोहित थत्ते यांनी विद्यार्थिनींना नृत्याचे प्रशिक्षण व मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. सुजाता कुलकर्णी, सौ. अश्विनी भावे, सौ. सुजाता रेपे आणि सौ. रिमा कुलकर्णी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वावर विठ्ठल चरणी अर्पण करण्यात आलेल्या या भक्तिरंगमय नृत्यसेवेने उपस्थित भाविकांना भक्ती, संस्कृती आणि कलेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. या नृत्यसेवेसाठी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री विठ्ठल मंदिराच्या संचालक मंडळाप्रती आयोजकांनी कृतज्ञता व्यक्त केली.

# ॲड. आर. टी. शर्मा यांच्याकडून माणिकताई करंदीकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

## कोणताही विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये – ॲड. आर. टी. शर्मा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शिक्षण हे प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत अधिकार असून आर्थिक परिस्थिती ही गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या आड येऊ नये, या भावनेतून सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेले ॲड. आर. टी. शर्मा यांनी जानकीबाई आपटे बालिकाश्रम संस्था संचलित माणिकताई करंदीकर हायस्कूल व ज्युनियर कॉलेज तसेच बालिकाश्रम बालक मंदिर प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना स्वखर्चातून मोफत शालेय गणवेश उपलब्ध करून दिले.

या गणवेश वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. निरज करंदीकर होते. संस्थेच्या सचिव दीप्ती करंदीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रमुख अतिथी म्हणून ॲड. आर. टी. शर्मा तसेच रेसिडेन्शियल हायस्कूलचे पर्यवेक्षक शरद सोनवणे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेशांचे वितरण करण्यात आले. नवीन गणवेश स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्टपणे दिसून येत होता.

यावेळी बोलताना ॲड. आर. टी. शर्मा यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरित करत समाजातील सक्षम घटकांनी गरजू विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, ‘‘शिक्षण हा समाजपरिवर्तनाचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. अनेक विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता असते; मात्र आर्थिक अडचणीमुळे त्यांना शिक्षणात अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते. अशा विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणे हे समाजातील प्रत्येक सक्षम नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे. शालेय गणवेश हा केवळ पोशाख नसून विद्यार्थ्यांमध्ये समानता, आत्मविश्वास आणि शिस्तीची भावना निर्माण करणारा महत्त्वाचा घटक आहे. कोणताही विद्यार्थी केवळ आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून दूर राहू नये, यासाठी भविष्यातही अशा सामाजिक उपक्रम राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. डॉ. निरज करंदीकर म्हणाले की, संस्थेची स्थापना ही समाजातील सर्वसामान्य आणि गरजू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे या ध्येयाने झाली आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, आत्मविश्वास आणि सामाजिक मूल्यांची जपणूक करण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. ॲड. आर. टी. शर्मा यांनी दिलेले सहकार्य हे केवळ गणवेश वाटप नसून विद्यार्थ्यांच्या भविष्यावर व्यक्त केलेला विश्वास आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळते आणि समाजात सकारात्मक संदेशही जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# ३१ जुलैला पद्मशाली समाजाचा पारंपरिक बागुलू पंडुगू सण उत्साहात साजरा होणार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** पद्मशाली समाजाचा पारंपरिक बागेचा सण (बागुलू पंडुगू) यंदा शुक्रवार, ३१ जुलै रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती पंच कमेटी पद्मशाली ज्ञाती समाजाचे अध्यक्ष संजय वल्लाकट्टी यांनी दिली.

दरवर्षी आषाढ शुद्ध पौर्णिमेनंतर येणाऱ्या शुक्रवारी हा सण साजरा करण्याची परंपरा असून, समाजातील प्रत्येक कुटुंब या उत्सवात श्रद्धेने सहभागी होत असते. धार्मिक परंपरा, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक ऐक्य यांचा सुंदर संगम या सणातून अनुभवायला मिळतो.

यादिवशी शितळादेवी (पोशम्मा तल्ली) आणि लक्ष्मीमाता (लचमम्मा तल्ली) यांची विधिवत पूजा-अर्चना केली जाते. तसेच लक्ष्मीमातेची पारंपरिक जत्राही भरते. या सणाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे शितळादेवी व लक्ष्मीआई यांना नैवेद्य अर्पण करून संपूर्ण समाजाच्या आरोग्यासाठी प्रार्थना केली जाते. आषाढ महिन्यात रोगराईचा प्रादुर्भाव वाढू नये, सर्वांना उत्तम आरोग्य लाभावे आणि संकटांपासून संरक्षण मिळावे, अशा भावनेने देवीला साकडे घालण्याची अनेक वर्षांपासूनची परंपरा आजही जपली जात आहे.

पद्मशाली समाजात गेल्या अनेक वर्षांपासून बागुलू पंडुगू मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. समाजातील प्रत्येक घटक, मग तो गरीब असो किंवा श्रीमंत, उच्चशिक्षित असो किंवा अशिक्षित, हा सण अत्यंत श्रद्धेने साजरा करतो. प्रत्येक घरामध्ये गोड पुरी, मेथीची भाजी यांसह पारंपरिक नैवेद्य तयार करून पोशम्मा देवी व लक्ष्मीआईला अर्पण केला जातो. त्यानंतर समाजबांधव पोतराजांसह पारंपरिक मिरवणूक काढतात. ही मिरवणूक तोफखाना येथील शितळादेवी मंदिर तसेच बालिकाश्रम रोडवरील जाधव मळ्यातील लक्ष्मीदेवी मंदिरात पोहोचते. या दोन्ही ठिकाणी विधिवत पूजा-अर्चा करण्यात येते आणि मोठी यात्रा भरते.

या सणामागील उद्देश केवळ धार्मिक नसून सामाजिक आणि पर्यावरणीयही आहे. देवीकडे संतुलित पर्जन्यवृष्टी व्हावी, दुष्काळ किंवा अतिवृष्टीमुळे कोणतेही नुकसान होऊ नये, शेती समृद्ध राहावी, निसर्गाचे रक्षण व्हावे आणि समाजात सुख-समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना केली जाते. यंदाच्या बागुलू पंडुगूचे औचित्य साधून प्रत्येक कुटुंबाने घरटी किमान एक रोप लावून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करावा, असे आवाहनही संजय वल्लाकट्टी यांनी केले आहे.

शितळादेवीच्या नावातच शीतपणा असल्यामुळे या देवीला थंड पदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्याची परंपरा आहे. यामध्ये दही, हळद टाकलेला भात, गोड पुरी, मेथीची भाजी, लिंबाची पाने, फुटाणे, नारळ, ओवा आणि थंड पाणी यांचा समावेश असतो. महिलावर्ग डोक्यावर थंड पाण्याचे कलश घेऊन वाजत-गाजत मिरवणूक काढतो.

# अर्बन बँक कॉलनी आषाढीला महिलांची दिंडी पालखी सोहळा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** छत्रपती संभाजी नगर रोडवरील अर्बन बँक कॉलनीत आषाढी एकादशीला महिलांची दिंडी पालखी सोहळा मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात पार पडला. कॉलनीतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या हौशी विठोबा मंदिरात पहाटे भार्गव जोशी यांच्या हस्ते विठ्ठल – रुक्मिणी मूर्तीला रुद्राभिषेक करण्यात आला.

सायंकाळी कॉलनीतील सर्व महिलांनी एकत्र येऊन छोट्या पालखी मधून विठ्ठल रुक्मिणी मूर्ती ची सजावट करून पालखी सोहळा आयोजित केला. या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी दोन चिमूकल्यांना विठ्ठल – रुक्मिणीचे वेशभूषा करून प्रत्यक्ष दिंडीत सहभागी करण्यात आले. डोक्यावर तुळस, गळ्यात टाळ, हाताने टाळी व मुखाने विठू नामाचा गजर करीत ही दिंडी संपूर्ण परिसरात मार्गक्रमण करीत पुन्हा मंदिरात आली. रजनी उदास, मंगल चौरे, संगीता वाखुरे, जनाबाई वाखुरे यांनी भजनाचा कार्यक्रम केला.

अभिजीत जोशी प्रज्ञा जोशी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या दिंडी सोहळ्यात भजन, फेर, फुगडीचा आनंद महिलांनी घेतला. यावेळी सरिता निक्रड, प्रणिता कुलकर्णी, प्रज्ञा जोशी, रेणुका गाडे, रसिका जोशी, रजनी पुंडलिक,संगीता यादव, कल्पना गवारे, तृप्ती यादव, कांचन मोरे, श्यामला पाटील, शोभा लगड आदींनी सहभाग घेतला होता. प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या या हौशी विठोबा मंदिरात आषाढी एकादशीला दिवसभर भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. या सर्व भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी तवस्सुल अकॅडमी देवदूताची भूमिका पार पाडणार - तेजश्री थोरात

## मुकुंदनगरमध्ये गरजू विद्यार्थ्यांसाठी तवस्सुल अकॅडमी मोफत कोचिंग क्लासचा शुभारंभ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** मुकुंदनगर परिसरातील गरजू व होतकरू मुला-मुलींना दर्जे दार शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन उपलब्ध व्हावे या उद्देशाने तवस्सुल अकॅडमीच्या वतीने मोफत कोचिंग क्लास सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या हस्ते झाले.

यावेळी माजी नगरसेवक समद खान, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यक जिल्हाध्यक्ष साहेबान जहागीरदार, सामाजिक कार्यकर्ते खालिद शेख, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी, विश्व मानव अधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष नवेद शेख, मौलाना आझादचे प्राचार्य फरजाना मिर्जा, तवस्सुल फाउंडेशनचे अध्यक्ष असीफ सय्यद, तारीक सय्यद, मोइन खान, समीर खान, सूफियान शेख, मुफ्ती अल्ताफ, अकबरअली शेख, जावेद शेख, जुनेद खान, फरहीन मोहसिन शेख यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मोफत कोचिंग क्लाससाठी साऊथ आफ्रिकेत इंजिनिअर म्हणून कार्यरत असलेले अकिब सय्यद यांनी आर्थिक सहकार्य केले असून, त्यांच्या पुढाकारातूनच हा उपक्रम साकार झाला आहे. या अकॅडमीमध्ये मराठी, उर्दू आणि इंग्रजी माध्यमातील दहावीच्या विद्यार्थ्यांना अनुभवी आणि दर्जेदार शिक्षकांमार्फत मार्गदर्शन केले जाणार आहे. तर पुढील टप्प्यात अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना देखील मार्गदर्शन उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

## शब्दकोडे क्रमांक : १६




**आडवे शब्द :** १. खबर नसलेला ४. भाल ६. नाशिकला जाताना लागणारा एक घाट ८. नादमय ठेका ९. थेट ११. झाडाचा मुख्य गाभा १२. ढंग १३. संन्यासाच्या हातात असतो तो गडू १५. चोपडी १६. घोषणा १७. भात शिजताना होणारा आवाज २०. इंग्रजीत-नाही ) २२. लक्ष्मी २४. मृदा २५. क्रिकेटमधील-धाव २६. एक पक्षी २८. उपस्थित ३२. शुष्क ३४. परिस्थितीने पिचलेला ३६. समीप ३८. चांगला ४०. समूह ४१. क्षार ४२. महाराष्ट्रातील एक जिल्हा ४५. पशू ४७. चांदी, तांबे किंवा सोन्याच्या पत्र्यावर उठावदार स्वरूपात कोरलेली कुलदेवता ४८. तळण्यासाठी वापरतात ४९. एक कडधान्य ५१. परीक्षा ५३. संपत्ती ५४. डोक्यावर केस नसलेला ५५. चितेवर रचलेली लाकडे **उभे शब्द :** १. सुरात नसलेला २. कुटील डावाची केलेली बोलणी ३. दोरी ५. बारीक पूड ६. कडू चवीचा ७. जून १०. फिर्याद १४. चोरी १८. एक अभिनेत्री ** अग्नीहोत्री १९. सावकारी करणारा २१. क्षुल्लक कारण २३. महिना २७. दिन २९. सातू ३०. एक सापाचा प्रकार ३१. शृंगार ३३. एक औद्योगिक उद्योग समूह ३५. पायात घालतात ३७. मुख ३९. ठिकाण ४१. मिठाचे प्रमाण जास्त असलेला ४२. आचारी ज्या कलेत पारंगत असतो ती कला ४३. वजा ४४. रस्सा ४५. बारीक-विरुद्ध ४६. वांती ५०. किडा ५२. महान

### शब्दकोडे क्रमांक : १५ चे उत्तर


| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | श्रां | ती | | सं | दे | श | | मा | | ज्ञा | न |
| रा | | व्र | त | | व | त | न | दा | र | | ड |
| म | का | | हा | ल | | क | र | | ब | ळ | |
| | र | त | न | | घा | | क | बा | डी | | वा |
| पो | वा | डा | | ह | स | रा | | ब | | पा | व |
| र | | का | ल | वा | | ज | न | | मे | | ट |
| | दै | | क | | पा | न | | च | ळ | व | ळ |
| ब | ना | व | | चा | य | | सा | प | | ळ | |
| घ | | ज | ड | | री | ता | | रा | डा | | बे |
| | भा | न | ग | ड | | प | द | क | | व | ध |
| चं | ग | | म | | क | मा | ल | | डा | | ड |
| पा | | सा | ग | र | | पी | | ह | क | ना | क |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### श्री वल्लभ प्रतिष्ठानतर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त रक्तदान शिबीर व धार्मिक कार्यक्रम




अहिल्यानगर - सध्या निर्माण झालेला रक्ताचा तुटवडा काहीअंशी कमी करावा, या उद्देशाने येथील श्री वल्लभ प्रतिष्ठानतर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त (दि. २९) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जास्तीत जास्त इच्छुक रक्तदात्यांनी रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबीर सावेडी भागातील गुलमोहोर रस्त्यावरील किर्लोस्कर कॉलनीमधील श्री दत्त भाव गुरु मंदिर येथे सकाळी १०.३० ते दुपारी ३ या वेळेत होणार आहे. नावनोंदणी व अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ९४२२७३९२८० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या मंदिरात दरवर्षी गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहाने साजरा करण्यात येतो. यानिमित्त अभिषेक व पूजा, आरती व प्रसाद, पालखी मिरवणूक तसेच महाप्रसादाचेही आयोजन करण्यात येते. याचबरोबर यावर्षी रक्तदान शिबीर घेण्यात येत आहे. हे सर्व कार्यक्रम बुधवारी (दि. २९) गुरुपौर्णिमेनिमित्त साजरे होणार आहेत, अशी माहिती श्री वल्लभ प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुवर्य विवेक रणभोर आणि श्री वल्लभ प्रतिष्ठानच्या इतर कार्यकर्त्यांनी दिली.

### निसर्ग व पर्यावरणाशी एकरूप होण्याचा संदेश देणारा 'बागुल पंडुगा' सण ३१ जुलैला



अहिल्यानगर - निसर्गाशी एकरूप होत पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण करण्याचा संदेश देणारा पद्मशाली समाजाचा पारंपरिक *'बागुल पंडुगा'* सण यंदा शुक्रवार, दि. ३१ जुलै रोजी साजरा करण्यात येणार आहे. या सणाच्या माध्यमातून निसर्ग, पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा अतूट संबंध अधोरेखित केला जात असून, समाजबांधवांनी या निमित्ताने वृक्षसंवर्धनाचा संकल्प करावा, असे आवाहन पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती सिरसुल यांनी केले. पद्मशाली समाजातील पूर्वजांनी भविष्यातील दूरगामी विचार करून निसर्गाचे संतुलन अबाधित राहावे, वृक्षसंपदा टिकून राहावी आणि मानवाने निसर्गाशी नेहमी एकरूप होऊन त्याचे संवर्धन व संरक्षण करावे, यासाठी विविध धार्मिक सण-उत्सवांच्या माध्यमातून समाजाला पर्यावरणपूरक संदेश दिला आहे. त्यातीलच एक महत्त्वाचा पारंपरिक सण म्हणजे 'बागुल पंडुगा' होय. आषाढ महिन्याच्या पौर्णिमेनंतर येणाऱ्या पहिल्या शुक्रवारी हा सण साजरा करण्याची परंपरा असल्याचे स्वाती सिरसुल यांनी सांगितले.

### टवाळखोरांना लगाम घाला; उर्दू शाळांजवळ दामिनी पथकाची नियमित गस्त वाढविण्याची पालकांची मागणी

पैठण - शहरातील नेहरू चौक परिसरात दहावी-बारावीच्या दोन उर्दू शाळा असून त्यापैकी एक मुलींची शाळा व एकात मुले व मुली एकत्र आहे. शाळेच्या परिसरात काही टवाळखोर युवक वारंवार घुटमळत असल्याने विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेबाबत पालकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. विद्यार्थिनींना निर्भय व सुरक्षित वातावरणात शिक्षण घेता यावे, यासाठी पैठण पोलीस ठाण्याच्या दामिनी पथकाने आठवड्यातून किमान दोन ते तीन वेळा शाळेच्या परिसराला भेट देऊन नियमित गस्त घालावी, अशी मागणी पालकांनी केली आहे. शाळा सुटण्याच्या तसेच सुरू होण्याच्या वेळेत काही युवक विनाकारण परिसरात थांबत असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. त्यामुळे विद्यार्थिनींना मानसिक त्रास सहन करावा लागत असून, अशा टवाळखोरांवर तातडीने कारवाई करून त्यांना लगाम घालण्याची आवश्यकता असल्याचे पालकांनी सांगितले. विद्यार्थिनींच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत पोलीस प्रशासनाने दामिनी पथकाच्या गस्तीचे नियोजन वाढवावे व शाळेच्या परिसरात सातत्याने लक्ष ठेवावे, अशी अपेक्षा पालकांनी व्यक्त केली आहे.

## शहीद पतीच्या स्मृतिनिमित्त 'बालघर'ला अनोखी मदत

**अंजली जवक यांचे दातृत्व । मैदानासाठी दिला तीन ट्रक मुरूम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहीद पतीच्या स्मृतीदिनानिमित्त तपोवन रस्त्यावरील बालघर प्रकल्पाला अंजली बळवंत जवक यांनी अनोखी मदत केली. नवीन जागेत स्थलांतर झालेल्या बालघर प्रकल्पाच्या मैदानासाठी त्यांनी तीन ट्रक मुरूम दिला.

सावेडी येथील रहिवासी (मुळ रा.रांजणगाव मशीद, ता. पारनेर) असलेल्या अंजली जवक यांचे पती बळवंत सुखदेव जवक पाच वर्षांपूर्वी शहीद झाले. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त गरजूंना मदत करण्याचे त्यांनी ठरविले होते. त्यानुसार त्यांनी बालघर प्रकल्पाला मदत दिली. या वेळी अंजली जवक यांच्यासह आकांक्षा जवक, सामाजिक कार्यकर्त्या शितल दळवी, बालघर प्रकल्पाचे संस्थापक युवराज गुंड, सहायक रूक्मिणी ठोंबरे आदी उपस्थित होते.

गरजू मुलांचा सांभाळ व संगोपन करणारी 'बालघर प्रकल्प' ही संस्था नुकतीच पूर्वीच्या जागेजवळच स्थलांतरीत झाली. या ठिकाणी अनेक कामांसाठी निधीची गरज आहे, हे ओळखून जवक यांनी आपल्या पतीच्या स्मृतिदिनानिमित्त बालघरला तीन ट्रक मुरूमांची मदत केली.

या वेळी अंजली जवक म्हणाल्या की, आपण प्रत्येकजण समाजासाठी काहीतरी देणे लागतो. त्यासाठी गरजूंना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे. या भावनेतूनच गरजू मुलांचा सांभाळ करणार्‍या बालघर प्रकल्पाला ही छोटीसी मदत केली.

'बालघर'चे युवराज गुंड म्हणाले की, बालघर प्रकल्पासाठी अंजली जवक ताईनी दिलेली मदत मोलाची आहे. तपोवन रस्त्यावरील बालघर प्रकल्प आता जवळच्याच छत्रपती चौकात स्थलांतरीत झाला आहे. या ठिकाणी अनेक कामे करायची असल्याने निधीचीही गरज आहे. त्यासाठी समाजानेही प्रकल्पाला मदत करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शेवगाव–** जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काकासाहेब म्हस्के विद्यालयातील इयत्ता चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना प्राचार्या सौ.शितल बांगर सौ. रोहिणी वाघ यांनी गुलाब पुष्प देत विद्यार्थ्यांचे कौतुक केले स्वरा भापकर, प्रांजल चेमटे, सुमित खेडकर या विद्यार्थ्यांनी नेत्र दीपक कामगिरी केली. सदर विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुनंदा धामणे,सौ.रोहिणी वाघ श्री.राजेंद्र पठारे सौ.विजया साबळे श्री.निलेश बांगर श्री.सुमेध मेढे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.आमदार श्री नरेंद्रजी घुले पाटील साहेब , संस्थेचे सचिव तथा मा.आमदार श्री चंद्रशेखर घुले पाटील साहेब ,अहिल्यानगर जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सौ.राजश्रीताई घुले पाटील शेवगाव पंचायत समिती सभापती डॉक्टर क्षितिज भैया घुले पाटील साहेब ,प्रशासकीय अधिकारी श्री.कारभारी नजन सर, संस्था समन्वयक श्री विजय काशीद सर , प्राचार्या सौ. शितल बांगर मॅडम मुख्याध्यापिका सौ सुनंदा धामणे मॅडम आदींनी अभिनंदन केले आहे

## समर्पण चातुर्मास २०२६ निमित्त पूज्य उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा. यांचा मंगल प्रवेश

**आचार्यश्रींच्या पुण्य भूमीत भाविकांचा अपूर्व उत्साह आनंददायी – पूज्य प्रविणऋषीजी महाराज**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जैन धर्मातील अतिशय पवित्र असा समर्पण चातुर्मासानिमित्त उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचा रविवारी सकाळी आनंदधामच्या प्रांगणात मंगल प्रवेश झाला. विनायक नगर, बोरा फार्म येथून आनंदधामकडे अत्यंत भव्य, दिव्य व ऐतिहासिक असा मंगल प्रवेश सोहळा झाला. भाविकांच्या अलोट गर्दीत झालेल्या या मंगल प्रवेशाने चातुर्मास काळातील धर्म जागरणाचा शंख निनादला.

पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांच्या नगरमधील समर्पण चातुर्मासाने महाराष्ट्रासह देशभरातील जैन समाजाचे लक्ष वेधले गेले आहे. उपाध्यायश्रींच्या मंगल प्रवेशाच्या शोभा यात्रेत अर्हम विज्जा परिवाराच्या १००८ कलशधारी महिला, आगम मंडळाच्या १००८ महिला, विविध युवक मंडळे, युवती मंडळे, महिला मंडळे, अग्रभागी जैन ध्वज घेतलेली मुले तसेच हजारो भाविक सहभागी झाले होते. अर्हम विज्जा परिवाराच्या प्रशिक्षकांमार्फत चातुर्मासाच्या चार महिन्यांत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध आध्यात्मिक, सांस्कृतिक, संस्कारवर्धक व व्यक्तिमत्त्व विकास शिबिरांची माहिती देणाऱ्या आकर्षक देखावे , भगवान महावीर, आचार्यश्रींच्या प्रतिमा असलेली सजवलेली वाहने शोभायात्रेचे आकर्षण ठरली. संपूर्ण शोभायात्रा मार्गावर दुतर्फा जैन ध्वजाची झालररूपी सजावट करण्यात आली होती. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर या मंगल प्रवेशाचा आनंद ओसंडून वाहत होता.

शोभायात्रेद्वारे आनंदधाम येथे उभारण्यात आलेल्या आनंद तीर्थ समवसरण' येथे उपाध्यायश्रींचे आगमन झाले. यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा., साध्वी पूज्य सत्यप्रभाजी म.सा., साध्वी पूज्य अमितज्योतीजी म.सा. आदींसह साधू साध्वीजी तसेच आ. संग्राम जगताप, राष्ट्रीय पाठशाळेचे अध्यक्ष विद्याधर काकडे, माजी जि.प. सदस्य हर्षदा काकडे, नगरसेवक गणेश भोसले, माजी महापौर भगवान फुलसौंदर, प्रकाश भागानगरे, मर्चंटस बँकेचे चेअरमन संजय चोपडा, समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी अहिल्यानगरचे सुपुत्र, मुंबईचे सुप्रसिद्ध उद्योगपती तसेच तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाबाई बोरा, पराग बोरा व बोरा परिवार, समर्पण चातुर्मास आयोजन कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, सहकोषाध्यक्ष विनोद कटारिया, कमिटीचे सर्व सदस्य, धनेश कोठारी, ईश्वर बोरा आदींसह देशभरातील जैन संघटनांचे पदाधिकारी, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत शोभायात्रेसाठी सकल राजस्थानी युवा मंच एवम महिला मंच, सकल राजस्थानी रायझिंग युथ एवम युवती मंच, जय आनंद महावीर युवक मंडळ, जय आनंद फाऊंडेशन, श्री बडीसाजन ओसवाल युवक संघ यांनी नियोजन व्यवस्था पाहिली.

## भुतकरवाडीत गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम उत्साहाने साजरा होणार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** उद्या बुधवार दिनांक २९ जुलै २०२६ रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त जय मल्हार योगी ट्रस्ट मठ भुतकरवाडी अहिल्यानगर येथे गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा होणार आहे. या कार्यक्रमाची रूपरेषा सकाळी नऊ वाजता श्रींचा महारुद्राभिषेक होऊन सुरुवात होईल, त्यानंतर दहा वाजता गुरुमाऊलींचा रुद्राभिषेक कार्यक्रम होईल.

त्यानंतर दुपारी बारा वाजता महाआरती होईल, त्याच्यानंतर दुपारी साडेबारा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. तसेच या गुरुपौर्णिमे निमित्त आज मंगळवार दिनांक २८ जुलै २०२६ रोजी रक्तदान शिबिर व ० ते १६ वर्षे वयाच्या बालकांसाठी सुवर्णप्राशन संस्कार शिबिर देखील आयोजन करण्यात आलेले आहे. तरी या रक्तदान शिबिरामध्ये व उद्याच्या गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमांमध्ये जास्तीत जास्त संख्येने भाविक भक्तांनी सहभागी होऊन गुरुभक्तीचा आनंद घ्यावा, असे आवाहन ट्रस्ट च्या वतीने करण्यात येत आहे.

## पैठण तालुक्यात 'तेल्या' रोगाचा प्रादुर्भाव; डाळिंब उत्पादक शेतकरी संकटात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण तालुक्यातील आडूळसह हिरडपुरी, बालानगर, पारूंडी, खादगाव, लोहगाव, इसारवाडी, धनगाव तसेच परिसरातील इतर गावांमध्ये डाळिंब पिकावर 'तेल्या' रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने डाळिंब उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. सततचा पाऊस, दमट वातावरण आणि हवामानातील बदलामुळे रोगाचा फैलाव झपाट्याने वाढला असून झाडावरील फळे कुजून गळत आहेत.

आडूळ, बालानगर, ईसारवाडी, पारूंडी, केंदळगाव, आगळवे गेवराई, एकतुनी, दाभकरूळ, अंतरवाली खांडी, हिरडपुरी, खादगाव, लोहगाव, इसारवाडी आणि धनगाव या भागांत मोठ्या प्रमाणावर डाळिंब बागा आहेत. यंदा या बागांवर तेल्या रोगाचे सावट आल्याने अनेक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. तीन ते चार वर्षे मेहनत घेऊन जोपासलेल्या बागा डोळ्यांसमोर उद्ध्वस्त होत असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. महागडी बुरशीनाशके आणि औषधांची फवारणी करूनही रोगावर नियंत्रण मिळत नसल्याची तक्रार शेतकरी करत आहेत.

डाळिंब हे पैठण तालुक्यातील प्रमुख नगदी पीक असून हजारो शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था या पिकावर अवलंबून आहे. त्यामुळे या रोगामुळे अनेक कुटुंबांच्या आर्थिक नियोजनावर मोठा परिणाम झाला आहे. प्रभावित शेतकऱ्यांनी कृषी विभागाने तातडीने बाधित बागांची पाहणी करून पंचनामे करावेत, तज्ज्ञांच्या माध्यमातून मार्गदर्शन करावे तसेच पीकविमा, नुकसानभरपाई आणि आर्थिक मदत त्वरित जाहीर करावी, अशी मागणी केली आहे.

## योग, भक्ती आणि संस्कारांचा अनोखा संगम; महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटरची योग दिंडी उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्री रामअवतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संलग्नित महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटर, अहिल्यानगर यांच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त भव्य योग दिंडीचे आयोजन करण्यात आले. आजच्या मोबाईल युगात नवीन पिढीला आपल्या धार्मिक सण-उत्सवांची माहिती मिळावी, भारतीय संस्कृतीची ओळख व्हावी आणि योगाविषयी आवड निर्माण व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या योग दिंडीत सर्व खेळाडू, पालक आणि प्रशिक्षक विठ्ठल-रुक्मिणी तसेच वारकरी वेशभूषेत सहभागी झाले होते. सौ. कोमल मानधना यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्माई पालखीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर योगा सेंटरमधून पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत योग व मल्लखांब या भारतीय पारंपरिक खेळांची आकर्षक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

या प्रसंगी आरोही बेडेकर हिच्या सुरेल विठ्ठलभक्तीपर गायनाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. चिमुकल्या विद्यार्थ्यांसोबत पालकांनीही मोठ्या उत्साहाने दिंडीत सहभाग घेत फुगडी, भजन आणि कीर्तनाचा आनंद लुटला. श्री रामअवतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट च्या ट्रस्टी सौ कोमल मानधना यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले व ट्रस्टचे ट्रस्टी मोहन मानधना यांनी विशेष कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये संस्कार, शिस्त, आरोग्य आणि भारतीय परंपरेबद्दल अभिमान निर्माण होतो, असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमास सेंटरचे मुख्य प्रशिक्षक उमेश झोटिंग, प्रणिता कवडे, आप्पा लाडाने यांच्यासह सर्व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन क्षितिजा हडप यांनी केले. योग, भक्ती आणि संस्कार यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी भरभरून कौतुक केले.

## श्री सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेची नूतन कार्यकारिणी जाहीर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर शहरातील नामांकित श्री सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेची ५९वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी संस्थेचे चेअरमन मा. श्री. जी. के. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या सभेत संस्थेच्या सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी नूतन संचालक मंडळाची एकमताने निवड करण्यात आली.

या निवडीत ज्ञानदेव शहाणे, संजय उगले, नारायणराव गुंड, प्रमोद देवधर, प्रसाद पवार, गौरव झंवर, मदन जामगांकर, स्वप्नील पारख, लिलाराम खन्ना, सौ. जयश्री बागडे व सौ. शशिकला भालसिंग यांची सर्वानुमते संचालक म्हणून पाच वर्षांसाठी निवड करण्यात आली. नवनिर्वाचित संचालक मंडळाचे उपस्थित सभासदांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

संस्थेच्या ५९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मांडण्यात आलेले विविध विषय सभासदांनी चर्चे अंती एकमताने व खेळीमेळीच्या वातावरणात मंजूर केले. संस्थेच्या आगामी वाटचालीसंदर्भातही यावेळी सकारात्मक चर्चा झाली. संस्थेची प्रगती, सभासदांच्या हिताचे उपक्रम तसेच संस्थेचा कारभार अधिक सक्षमपणे पुढे नेण्याबाबत नवनिर्वाचित संचालक मंडळाकडून अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या.

दरम्यान, संस्थेचे मावळते चेअरमन मा. श्री. जी. के. पाटील यांनी तब्बल ३१ वर्षे संस्थेचा कारभार समर्थपणे सांभाळत संस्थेला नावारूपाला आणण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्यकाळात संस्थेचा कारभार शिस्तबद्ध, पारदर्शक व चोखपणे हाताळण्यात आला. संस्थेच्या विकासासाठी त्यांनी दिलेल्या प्रदीर्घ योगदानाबद्दल सभासदांच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

डॉ. स्वरुपकुमार मगर, डॉ. सोपान गोरे व श्री. विजयराव देशपांडे यांच्या हस्ते जी. के. पाटील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याबद्दल उपस्थितांनी गौरवोद्गार काढत त्यांचे अभिनंदन केले.

## विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा देणे हीच संस्थेची प्राथमिकता - दिलीप गुंदेचा

**सविता रमेश फिरोदिया प्रशालेची शिष्यवृत्ती परीक्षेत दमदार कामगिरी; चौथीचे ४४ तर सातवीचे १४ विद्यार्थी पात्र**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शिशु संगोपन संस्था संचालित सविता रमेश फिरोदिया प्रशालेने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता चौथीच्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत प्रशालेतील ५२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल ४४ विद्यार्थी पात्र ठरले असून प्रशालेचा ८४.३ टक्के निकाल लागला आहे. तसेच यातील १८ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण मिळवून विशेष कामगिरी केली आहे.

इयत्ता सातवीच्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेतही प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेची चमक दाखवली. या परीक्षेसाठी प्रशालेतील २१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १४ विद्यार्थी पात्र झाले असून प्रशालेचा ६६.६६ टक्के निकाल लागला आहे. विशेष म्हणजे सातवीच्या परीक्षेतही पाच विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण मिळविले आहेत. दोन्ही परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश प्रशालेच्या शैक्षणिक गुणवत्तेची आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीची साक्ष देणारे ठरले आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेतील या यशामुळे सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाबरोबरच स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करून देणे, सराव चाचण्या घेणे, विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर मार्गदर्शन करणे तसेच प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीकडे वैयक्तिक लक्ष देणे, या प्रयत्नांचा या निकालात मोठा वाटा असल्याचे दिसून येते.

इयत्ता चौथीच्या ५२ विद्यार्थ्यांपैकी ४४ विद्यार्थी पात्र ठरल्याने ८४.३ टक्के निकाल ही प्रशालेसाठी विशेष अभिमानाची बाब ठरली आहे. त्याचबरोबर १८ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण मिळविल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची उंचीही अधोरेखित झाली आहे. इयत्ता सातवीमध्ये २१ विद्यार्थ्यांपैकी १४ विद्यार्थी पात्र होऊन ६६.६६ टक्के निकाल नोंदविला गेला असून पाच विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण मिळविले आहेत.

शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा म्हणाले की, शिष्यवृत्ती परीक्षेत सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश हे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यांचे फलित आहे. केवळ परीक्षेतील गुणांपेक्षा विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी, आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जाण्याची क्षमता निर्माण करणे महत्त्वाचे आहे. चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांनी पात्रतेची मिळविलेली ही कामगिरी प्रशालेच्या शैक्षणिक वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी संस्था प्रयत्नशील राहील.

ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत महत्त्वाची आहे. २०० पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसह पात्र ठरलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे हे यश कौतुकास्पद आहे. एखाद्या विद्यार्थ्याला यश मिळाल्यानंतर त्याचे कौतुक करणे जितके आवश्यक आहे, तितकेच इतर विद्यार्थ्यांना त्यातून प्रेरणा देणेही महत्त्वाचे आहे. शैक्षणिक गुणवत्ता बरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे संस्थेचे धोरण असून, भविष्यात शिष्यवृत्ती परीक्षेत आणखी चांगला निकाल मिळविण्यासाठी शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

# भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी ‘करिअरची वारी’ ठरली प्रेरणादायी

**मासूम संस्थेकडून करिअर मार्गदर्शन, गरजवंत विद्यार्थ्यांना पाच सायकली भेट; निवृत्त जिल्हा न्यायाधीशांकडून पुस्तके व आर्थिक मदत**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिवसभर कष्ट करून रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्याची दिशा मिळावी, शिक्षणासोबत रोजगार, स्वयंरोजगार आणि कौशल्य विकासाच्या संधींची माहिती व्हावी या उद्देशाने हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे ‘करिअरची वारी’ या अनोख्या संकल्पनेतून करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शिक्षणानंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधी, व्यावसायिक अभ्यासक्रम, कौशल्याधारित प्रशिक्षण तसेच स्वयंरोजगाराच्या मार्गांविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे मासूम संस्थेच्या वतीने गरजवंत विद्यार्थ्यांना पाच सायकलींचे वाटप करण्यात आले. तसेच सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश चंद्रचूड गोंगले यांनी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी स्पर्धा परीक्षा व अवांतर वाचनाची उपयुक्त पुस्तके भेट देण्याबरोबरच शाळेसाठी ११ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली. या कार्यक्रमास मासूम संस्थेचे प्रोग्राम हेड अमर डावल (मुंबई), रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, प्राचार्य सुनील सुसरे, इंडियन अकॅडमी ऑफ फॅशन डिझायनिंगच्या संचालिका रचना काकडे, मिटकॉनचे सागर गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविकात रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, दहावी–बारावीनंतर करिअरचे स्पष्ट ध्येय निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाची पदवी महत्त्वाची असली तरी प्रत्यक्ष काम करण्याची क्षमता आणि कौशल्य अधिक महत्त्वाचे ठरते. ‘‘प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये एखादी कला, गुण किंवा विशेष क्षमता दडलेली असते. त्या क्षमतेची ओळख करून तिचा विकास केल्यास यश निश्चित मिळते. मासूम संस्था केवळ करिअर मार्गदर्शनच करत नाही, तर व्यावसायिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती आणि विविध प्रकारचे सहकार्यही करते. विद्यार्थ्यांनी या संधींचा नक्की लाभ घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

प्राचार्य सुनील सुसरे यांनी उपस्थितांचे स्वागत करून रात्रशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. शिक्षणासोबत व्यक्तिमत्त्व विकास, करिअर नियोजन आणि कौशल्यविकासावर भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

मासूम संस्थेचे प्रोग्राम हेड अमर डावल यांनी इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणानंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअरच्या संधी, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या पर्यायांबाबत मार्गदर्शन केले. मासूम संस्था शिक्षण अर्धवट सोडलेल्या तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, ‘‘आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ पदवी पुरेशी नाही. कौशल्य, सातत्य, आत्मविश्वास आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान यांची जोड असेल तर कोणताही विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो. स्वतःच्या आवडीचा आणि क्षमतेला साजेसा व्यवसाय किंवा करिअर निवडल्यास आयुष्यात समाधान आणि यश दोन्ही मिळते.’’ त्यांनी विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध कौशल्य विकास योजना, शिष्यवृत्ती योजना, व्यावसायिक प्रशिक्षण तसेच उद्योग उभारणीसाठी उपलब्ध असलेल्या संधींचाही लाभ घेण्याचे आवाहन केले.

इंडियन अकॅडमी ऑफ फॅशन डिझायनिंगच्या संचालिका रचना काकडे यांनी फॅशन डिझायनिंग क्षेत्रातील वाढत्या रोजगाराच्या संधी, उद्योजकता आणि सर्जनशीलतेला मिळणारे व्यासपीठ याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर मिटकॉनचे सागर गायकवाड यांनी नर्सिंग असिस्टंट, सोलर सिस्टिम टेक्निशियन यांसारख्या रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांची माहिती देत कमी कालावधीत कौशल्य आत्मसात करून चांगल्या उत्पन्नाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, असे सांगितले.

सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश चंद्रचूड गोंगले यांनी दिवसभर काम करून रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे आणि चिकाटीचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, ‘‘परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षणाची वाट सोडू नका. वाचनाची सवय, प्रामाणिकपणा, शिस्त आणि सातत्य या गुणांच्या बळावर मोठी स्वप्ने साकार करता येत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात मासूम संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सातत्याने विविध शैक्षणिक व प्रेरणादायी उपक्रमांचा लाभ मिळत असल्याबद्दल संस्थेच्या संचालिका निकिता केतकर, संचालक कमलाकर माने आणि युवराज बोराडे यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश भुते यांनी केले, तर आभार प्रदर्शन बाळू गोरडे यांनी मानले. यावेळी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहिल्यानगर रनर्स क्लबची ‘पंढरपूर रनवारी २०२६’ यशस्वीरित्या संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर रनर क्लब चे वतीने अहिल्यानगर ते पंढरपूर अशी वारी अत्यंत श्रद्धा, शिस्त आणि सेवाभावाचा अनोखा संगम असे दर्शन घडवून करण्यात आली.

अहिल्यानगर रनर्स क्लब तर्फे आयोजित ‘‘रनवारी २०२६‘‘ हा अहिल्यानगर ते पंढरपूर असा दोन दिवसीय धावता वारी सोहळा नुकताच अत्यंत उत्साहात, नियोजनबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडला.

या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व रनर्सनी विठ्ठल नामाचा अखंड गजर करत भक्ती, फिटनेस आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम अनुभवला. हा केवळ एक धावण्याचा कार्यक्रम नसून, वारीच्या परंपरेला आधुनिक फिटनेस संस्कृतीशी जोडणारा एक प्रेरणादायी उपक्रम ठरला.

कार्यक्रमाच्या संपूर्ण कालावधीत सहभागी धावपटूंना उत्कृष्ट नियोजनाचा अनुभव मिळाला. मार्गावर नियमित हायड्रेशन पॉइंट्स, पौष्टिक आहार, वैद्यकीय मदत, वाहन सहाय्य, सुरक्षा व्यवस्था, फोटोग्राफी, वेळेचे काटेकोर नियोजन आणि स्वयंसेवकांचे सातत्यपूर्ण सहकार्य यामुळे संपूर्ण प्रवास अत्यंत सुरळीत आणि सुरक्षित झाला. प्रत्येक सहभागीने समाधान व्यक्त करत या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

रनवारीचे सर्व टप्पे नियोजनानुसार पूर्ण झाले आणि सर्व धावपटूंनी सुरक्षितपणे पंढरपूर गाठून श्री. विठ्ठल–रुक्मिणीचे दर्शन घेतले.भक्ती, संघभावना, शिस्त आणि परस्पर सहकार्यामुळे हा प्रवास प्रत्येकासाठी अविस्मरणीय ठरला.

या उपक्रमाच्या यशामागे अहिल्यानगर रनर्स क्लबच्या सर्व आयोजक, स्वयंसेवक, कॅप्टन्स, सपोर्ट क्रू, वैद्यकीय पथक, हायड्रेशन टीम, फोटोग्राफर्स तसेच प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व दात्यांचे व हितचिंतकांचे मोलाचे योगदान राहिले. त्यांच्या निःस्वार्थ सेवेमुळे प्रत्येक वारकऱ्याला सुरक्षित, आनंददायी आणि संस्मरणीय अनुभव मिळाला.

अहिल्यानगर रनर्स क्लबने यापूर्वीही अनेक सामाजिक व फिटनेसविषयक उपक्रम यशस्वीरित्या राबविले असून, ‘‘रनवारी २०२६‘‘ हा त्यामधील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. यावेळी वारी मध्ये ३३ पुरुष,७ महिला सहभागी झाल्या होत्या.या उपक्रमाने श्रद्धा, आरोग्य, शिस्त आणि समाजसेवा यांचा सुंदर संदेश समाजापर्यंत पोहोचवला.

अहिल्यानगर रनर्स क्लबतर्फे या उपक्रमाला सहकार्य करणाऱ्या सर्व सहभागी, सहकारी संस्था, प्रायोजक, प्रशासन, पोलीस विभाग, वैद्यकीय टीम, माध्यम प्रतिनिधी आणि सर्व हितचिंतकांचे या क्लब चे वारी यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणारे जगदीप मकर, योगेश खरपुडे, गौतम जायभाय, विलास भोजने यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# फिरोदिया शिवाजियन्स आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेला दमदार सुरुवात; आठरे पाटील स्कूलचे वर्चस्व

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील शालेय फुटबॉलपटूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी उपलब्ध करून देणाऱ्या फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेला सोमवारी (दि. २७ जुलै) उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर फुटबॉलचा थरार रंगला असून, पहिल्याच दिवशी विविध वयोगटांतील सहा सामने खेळविण्यात आले. या सामन्यांमध्ये आठरे पाटील स्कूलने तीनही सामन्यांत विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले, तर ऑक्झिलियम कॉन्व्हेंट आणि आयकॉन पब्लिक स्कूल यांच्यातील तीन सामने अत्यंत अटीतटीचे होत दोन अनिर्णित आणि एक बरोबरीत सुटला.

अहमदनगर महाविद्यालयाच्या सौजन्याने तसेच अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (एडीएफए) यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत जिल्ह्यातील विविध नामांकित शाळांचे संघ मोठ्या उत्साहाने सहभागी झाले असून मैदानावर सुरुवातीपासूनच क्रीडाप्रेमींची उत्स्फूर्त उपस्थिती पाहायला मिळाली.

स्पर्धेतील उद्घाटनाचा सामना १६ वर्षांखालील मुलांच्या गटात आठरे पाटील स्कूल आणि अशोकभाऊ फिरोदिया स्कूल यांच्यात खेळविण्यात आला. या सामन्यात आठरे पाटील स्कूलने उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत ३–१ अशा फरकाने विजय मिळविला. आठरे पाटीलकडून शौर्य भंडारीने १७ व्या मिनिटाला पहिला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर सोमनाथ तावडेने २४ व्या मिनिटाला दुसरा गोल करत आघाडी भक्कम केली. सामन्याच्या उत्तरार्धात अशोक चंदने ५५ व्या मिनिटाला तिसरा गोल झळकावत विजयावर शिक्कामोर्तब केले. अशोकभाऊ फिरोदिया स्कूल कडून आयुष गाडीलकर याने एकमेव गोल केला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटातही आठरे पाटील स्कूलने विजयी परंपरा कायम राखली. अशोकभाऊ फिरोदिया स्कूलविरुद्धच्या या सामन्यात देहान जाधवने २२ व्या मिनिटाला केलेला एकमेव गोल निर्णायक ठरला. संपूर्ण सामन्यात आठरे पाटीलच्या बचावफळीने भक्कम कामगिरी करत प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करू दिला नाही आणि १–० असा विजय नोंदविला.

१६ वर्षांखालील मुलींच्या गटात आठरे पाटील स्कूल आणि पोदार स्कूल यांच्यात अत्यंत रंगतदार सामना झाला. दोन्ही संघांनी आक्रमक खेळ करत प्रेक्षकांची मने जिंकली. आठरे पाटील स्कूलकडून इरम कडूस आणि प्रांजल भोर यांनी प्रत्येकी एक गोल करत संघाला २–१ असा विजय मिळवून दिला. पोदार स्कूलकडून काव्या झावरे हिने एकमेव गोल नोंदविला.

१२ वर्षांखालील मुलांच्या गटात ऑक्झिलियम कॉन्व्हेंट आणि आयकॉन पब्लिक स्कूल यांच्यातील सामना सुरुवातीपासून शेवटपर्यंत अत्यंत चुरशीचा झाला. दोन्ही संघांनी सातत्याने आक्रमण केले, मात्र कोणत्याही संघाला गोल करण्यात यश आले नाही. परिणामी हा सामना ०–० असा अनिर्णित राहिला.

# सीताराम सारडा विद्यालयाच्या वृक्षदिंडीची शहरात पारंपरिक मिरवणूक

**दिंडी मार्गात सर्वांना रोपे वाटून दिंडी सोहळा साजरा करण्यात आला । विठूनामाच्या गजराने अहिल्यानगर दुमदुमले!**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीचे औचित्य साधत सीताराम सारडा विद्यालय व हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वृक्षदिंडीने संपूर्ण शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले.आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांनी शहरातील प्रमुख मार्गावरून वृक्षदिंडीची मिरवणूक काढली. विविध कारणामुळे निसर्गाचे होणारे नुकसान तसेच पर्यावरण सुदृढ व्हावे म्हणून प्रत्येकाने झाडे लावणे आवश्यक आहे. यावर्षी ‘‘वृक्षदिंडीचे‘‘ आयोजन केले असून दोनशेहून अधिक रोपे दिंडी मार्गावरील नागरिकांना, दुकानदारांना आणि पालकांना प्रेमपूर्वक देण्यात आली. या रोपांचे संगोपन करावे असा आग्रह विद्यार्थी धरत होते. विद्यालयाच्या हरित सेने मार्फत आणि शहराचे उपमहापौर धनंजय जाधव यांच्या सहकार्याने प्रत्येक विद्यार्थ्याला एक एक रोप देण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सीताराम सारडा विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा व हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी पालखीचे पूजन करण्यात आले.सीताराम सारडा विद्यालय चेक्षरमन अजित बोरा,शालेय समिती सदस्य संजय मुदगल,ॲड. दिपक शर्मा, मुख्याध्यापिका मंगला डोळस, प्राथमिक शाळा मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे, अशोक डोळसे, संजय शेकडे, विनोद जोशी, सौ निमा राहींज, सौ दिपाली लगड, दीपक आरडे, अमोल कदम, गोवर्धन पांडुळे, माजी, विद्यार्थी , पालक आदींसह शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्कार आणि सामाजिक एकोप्याचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणाऱ्या य उपक्रमाचे सर्वांनी मनापासून स्वागत केले. अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये संस्कार, शिस्त आणि सांस्कृतिक परंपरेबद्दल आत्मीयता निर्माण होते, अशा भावना सीताराम सारडा विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा यांनी व्यक्त केली आहे.

विद्यार्थिनींच्या लेझीम पथकाने आणि छोट्या विद्यार्थिनींच्या मृदंग, टाळ , विनेसह केलेल्या रिंगणाचे मोठे कौतुक नगरकरांनी केले. यासाठी क्रीडाशिक्षक चंद्रशेखर वाघ, शिक्षिका सौ क्रांती मुंदानकर, सौ शितल शिंदे व सौ वृषाली जोशी यांनी प्रयत्न केले.

विठ्ठल – रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर संत तुकाराम या संतांच्या वेशभूषेत आणि वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशात सजलेल्या बालगोपाळांनी नगरकरांचे लक्ष वेधून घेतले. नऊवारी साडी हातात टाळ,भगवे झेंडे,डोक्यावर तुळशी वृंदावन, गळ्यात तुळशीमाळ आणि कपाळावर गंध–टिळा अशा चिमुकल्यांनी पांडुरंग हरी, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल अशा जयघोषाने शहर परिसर दुमदुमून गेला होता.

# धावडेवाडी शाळाचा दिंडी उत्सव उत्साहात साजरा

**माऊली मंदिर खामकरवाडीत दिंडी सोहळ्यास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**बेलवंडी–** धावडेवाडी येथील शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दिंडी सोहळ्यास पालक, विद्यार्थी, ग्रामस्थ तसेच खामकरवाडी तरुण मंडळ, खामकरवाडी भजनी मंडळ, शिंदेवाडी/कुताळवाडी तरुण मंडळ, धावडेवाडी व अडसुरेवाडी येथील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रम आनंददायी व भक्तिमय वातावरणात पार पाडला.

ग्रामस्थांनी दिलेल्या भरघोस सहकार्यामुळे शिक्षकवर्गाला नवचैतन्य, प्रेरणा व स्फूर्ती मिळाल्याची भावना मुख्याध्यापक विठ्ठल गावडे, सुनिता ओहोळ , यांनी व्यक्त केली.

दिंडी सोहळ्यानिमित्त विविध मान्यवर व संस्थांकडून अल्पोपहार व आर्थिक स्वरूपात सहकार्य करण्यात आले. शिंदेवाडी/कुताळवाडी तरुण मंडळाकडून मोतीचूर लाडू व फरसाण, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश सर यांच्याकडून जिलेबी व पोहे, दिनेश खामकर यांच्याकडून फरसाण, तर बाळासाहेब शिंदे यांनी काकडीची व्यवस्था केली. तसेच ग्रामस्थ, पालक आणि शाळा व्यवस्थापन समिती यांच्या सहकार्याने ३,८५० इतकी रोख देणगी प्राप्त झाली. दिंडी सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व दानशूर व्यक्ती, पालक, ग्रामस्थ, स्वयंसेवक आणि विविध मंडळांचे शाळेच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले. भविष्यातही असेच प्रेम, सहकार्य व पाठबळ लाभेल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली.

(पान १ वरून)

## कुळधरण येथे एलसीबीच्या छाप्यात १५ जुगारी अटकेत

कर्जत पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि संतोष मुटकुळे, सपोनि हरीश भोये, अंमलदार सोमनाथ झांबरे, अमोल कोतकर, भाऊसाहेब काळे, भाऊसाहेब खेडकर, सुनील मालणकर आणि चालक अरुण मोरे यांच्या पथकाने केली.

## भटक्या कुत्र्याचा लहान बालकावर हल्ला

उपनगरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महापौर उपमहापौर यांनी दखल घ्यावी.

ऐतिहासिक अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर सौ ज्योतीताई गाडे आणि उपमहापौर ॲड श्री धनंजय जाधव यांनी या प्रकाराबाबत गांभीर्याने दखल घेऊन महानगरपालिकेचे आरोग्य विभागाचे अधिकारी कर्मचारी तसेच श्वान निर्बीजीकरणाचा ठेका दिलेल्या संस्थेचे पदाधिकारी यांना तात्काळ आदेश देऊन भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.

## आदेशाचा भंग करणारा तडीपार आरोपी जेरबंद

पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव, पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, शामसुंदर जाधव, रमीजराजा आतार, भगवान थोरात व चालक चंद्रकांत कुसळकर यांच्या पथकाने केली.

## राष्ट्रवादी विलिनीकरणाबाबत दिल्लीत हालचालींना वेग

राष्ट्रवादीत विलीन होऊनच एनडीएमध्ये येण्याची अट घातल्याचीही माहिती समोर आली होती. मात्र, सुनेत्रा पवारांचा विलिनीकरणाला विरोध असल्याचीही चर्चा होती. या पार्श्वभूमीवर पार्थ पवार व प्रफुल पटेल यांनी शरद पवार यांची घेतलेली भेट महत्त्वाची मानली जात आहे. दिल्लीत शरद पवार यांची भेट घेतल्याच्या वृत्ताला प्रफुल पटेल यांनी दुजोरा दिला आहे.

## देशभरात गो सन्मानार्थ एकच कायदा व्हावा!

गोहत्या बंद करण्यासाठी कठोर कायदा करण्यात यावा. गाईला राष्ट्रमाता राष्ट्रीय देवी राष्ट्रीय पूजा राष्ट्रीय वारसा असा सन्माननीय दर्जा द्यावा यासाठी आवश्यक तो कायदा करावा. गो सेवेसाठी केंद्रीय मंत्रालय स्थापन करावे व भू सेवेसाठी राष्ट्रीय कायदा करावा. राष्ट्रीय गोचर बोर्डाची स्थापना करावी. या मागण्यांसाठी सह्यांची ही मोहीम देशभर एकाच वेळी राबविण्यात येत आहे.

यापुढील टप्प्यात या आंदोलनाची शासकीय पातळीवर दखल घेतली गेली नाही तर आंदोलनाचा तिसरा टप्पा हाती घेतला जाईल व चौथ्या टप्प्यांमध्ये या आंदोलनातील आयोजक संत महात्म्ये प्रत्यक्ष आमरण उपोषणाला बसणार आहेत

या दुसऱ्या टप्प्यांतर्गत जिल्ह्याला तीन लाख सह्यांचे उद्दिष्ट देण्यात आले होते पैकी ३ लाख ४१ हजार इतक्या विक्रमी सह्या प्राप्त करून जिल्ह्याने आपले उद्दिष्ट पूर्ण केले. विविध माध्यमातून या सहा अजूनही गोळा होत आहेत त्यामुळे हा आकडा साडेतीन लाखापर्यंत पोहोचेल.

सह्यांचे हे अभियान राबवताना जिल्हाभरातील गोशाळा, गोसेवक, गौरक्षक, संत–महात्मे विविध सप्ताह समारंभानिमित्त जमलेले विविध मंदिरांचे भक्त, हितचिंतक विविध उद्योजक, व्यावसायिक, उच्चपदस्थ सरकारी अधिकारी तसेच सर्व स्तरातील स्त्री पुरुष यांनी या निवेदनावर सह्या केल्या आहेत.

जिल्हाभरातील शाळांमधूनही हे अभियान राबवण्यात आले विद्यार्थ्यांच्या माध्यमातून त्यांच्या पालकांच्या व परिसरातील त्यांच्या नातेवाईकांच्या आजूबाजूच्या गो हित संरक्षक नागरिकांच्या सह्या गोळा करण्यात आल्या व त्यांच्या कडे जाऊन गो संरक्षणाच्या संदर्भात करण्यात येणाऱ्या या अभियानाबाबत जनजागृती करण्यात आली.

या अभियानाला सर्व स्तरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला नागरिकांनी या मागण्या तत्वतः मान्य व्हाव्यात यासाठी तन–मन–धनाने योगदान देण्याचे मान्य केले असून सक्रियपणे या आंदोलनात ते सहभागी होत आहेत.